
मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ जुलै २०१७ वर्ष १० वे/अंक ७

# राष्ट्रवादी


स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## वर्धापनदिनाचा संदेश

धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी पक्षांच्या व्यापक आघाडीची गरज

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा १९ वा वर्धापनदिन




मॅक्सवेल' पुरस्कार संमारंभासाठी मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली हा मी माझा सन्मान समजतो. सर्वप्रथम मी सर्व पुरस्कार विजेत्यांचे मनापासून अभिनंदन करतो.पुरस्कार विजेत्या प्रत्येकाने व एकत्रितपणे पुणे व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी भरीव योगदान दिले आहे. किरण कर्णिक आणि मी प्रदीर्घकाळ एकत्रित आहोत. अनेक प्रकल्पावर एकत्रितपणे काम केले आहे. त्यांचा सहवास मला सदैव मिळत राहील अशी मला आशा आहे. ते अतिशय नम्र, साधे असून तो माझा हितचिंतक आहे. त्यांची भूमिका अगदी सुस्पष्ट असते. त्यांनी मला वेळोवेळी भरपूर पाठिंबा दिला आहे, माझ्या प्रवासात ते महत्त्वाचे भागीदार आहेत.



हे शहर (पुणे) बुद्धिवंतांचे शहर आहे. त्यामुळेच कदाचित माझ्यात समज वाढली असावी. पुण्याशी माझे ऋणानुबंध हे फार पूर्वीपासूनचे आहेत. कारण, माझे सासरे पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजला जात होते. आज ते १०२ वर्षांचे असून शिकागो येथे आमच्यासमवेत राहात आहेत. ते १०२ वर्षांचे आहेत. मी जेव्हा त्यांना पुण्यातील फोटो दाखवून मी तुमच्या पुण्यात होतो व अनेक विद्वान लोकांच्या भेटीगाठी झाल्या हे सांगितल्यावर त्यांना नक्की खूप आनंद होईल, येत्या सोमवारी त्यांची माझी भेट होईल. त्या वेळी त्यांना खूप आनंद होईल. वयाच्या १०२ व्या वर्षी ते सगळीकडे फिरतात, मनसोक्त गप्पा मारतात, बियरही पितात. जीवनातील आनंद उपभोगत आहेत. विद्यार्थीदिशेत ते पुण्यात होते. पुण्यातील आठवणीत ते अनेकदा स्वतःला हरवून जातात, ते म्हणायचे जेथे जेथे मी शिक्षण घेतले, त्यात पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज सगळ्यात उत्तम होते. या कॉलेजमधून तीन लाख विद्यार्थी शिकून बाहेर पडले, हे ऐकून मला आनंद झाला, तंत्रज्ञानातील माझ्या




# 'डिजीटल इंडिया'ची पायाभरणी राजीव गांधींची

**अमेरिकेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ सॅम पित्रोदा यांनी पुण्यातील यशदा सभागृहात मॅक्सवेल पारितोषिक वितरण समारंभात केलेले भाषण.**

प्रवासाचे ओझरती ओळख मी आपणास करुन देऊ इच्छितो. टेक्नॉलॉजीमधील माझा प्रवास हा अतिशय रंजक असा आहे. माझ्या या प्रवासात अनेक चढउतार आले, अनेक अपघात घडले, रोमान्सही अनुभवास आले. ७५ वर्षांपूर्वी ओरिसातील एका लहान आदिवासी खेड्यात १९४२ मध्ये माझा जन्म झाला. माझे वडील शिकलेले होते. माझ्या गावात शाळा नव्हती, डॉक्टर नव्हते, नर्स नव्हती, फार्मसी नव्हती, काहीही नव्हते. कामधंदा शोधण्यासाठी माझे वडिल ओरिसा मधून गुजरातला आले. आम्ही आठ भावंडे आहोत. आम्ही आठही भावंडे शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त असून सर्वजण अमेरिकेत आहोत. अभ्यासातही सर्वांची चांगली प्रगती झाली. त्याच खेड्यातली ही आठ मुले आहेत, यावर विश्वास बसत नाही. हा सर्व तांत्रिक बदल मी माझ्या आयुष्यात बघितला. त्या खेड्यात १९५० च्या दरम्यान जेव्हा प्रथम वीज आली तेव्हा मी ओरिसा सोडून गुजरातमध्ये गेलो होतो. ती घटना खरोखर डोळे उघडणारी होती. वीज तुमच्या घराचा कायापालट कसा करते हे अनुभवास आले. कारण, आपल्याला फक्त कंदीलच माहिती होता. जेव्हा आमच्या घरी प्रथम रेडिओ आला, तेव्हा जे तुम्हाला ऐकवले जायचे ते तुम्ही ऐकू शकत होता. मला फिजिक्सची खूप आवड होती. त्यामुळे मी फिजिक्सचा अभ्यास केला. मला गणितही खूप आवडायचे.

एके दिवशी मी वृत्तपत्रात वाचले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष

केनेडी यांनी चंद्रावर माणूस पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या वेळी मी तरुण, उत्साही व तितकाच मूर्खही होतो, मी म्हटले, मला अमेरिकेला जायचे आहे. माझ्याकडे पैसे नव्हते. उसनवारीने पैसे गोळा केले आणि बोटीने मुंबईहून कराची, कराचीहून एडन, सुवेझ कालवा, नेपल्समार्गे जिनिव्हा. नंतर जिनिव्हा येथून रेल्वेने लंडनला पोहोचलो. लंडनहून विमानाने न्यूयॉर्क आणि न्यूयॉर्कहून बसने शिकागो!. १९६४ ची ती घटना. इतकी कडाक्याची थंडी पडली होती, मी माझ्या आयुष्यात कधीही बर्फ पाहिलेला नव्हता, दरवाजांना मी कधी डोअर नॉब पाहिले नव्हते. लॅचेस पाहिले होते, तेथे पाहात असलेली प्रत्यक गोष्ट मला नवीन वाटत होती. कारचा तर मी विचारच करू शकत नव्हतो. अमेरिकेत जाण्यापूर्वी मी माझ्या आयुष्यात कधीही साधा फोन देखील केलेला नव्हता. ज्याच्याकडे फोन असायचे ते श्रीमंत होते. आणि मी त्यांचा मित्र असण्याची शक्यताही नव्हती. तेव्हा फोन करण्याचीही गरज नव्हती. अमेरिकेत मी माझा पहिला फोन पाहिला. त्याचा आकार खेळण्यातल्या माकडासारखा होता. मी टेलिव्हीजनकडे ओढला गेलो. त्याची डिझाइन कशी करायची याची मला माहिती होती. भारतातल्या एका मुलामध्ये असलेली ही उत्सुकता मी अमेरिकेत गेल्यावर दसपटीने वाढत गेली. मी चोहोबाजूला पाहायचो, मला तिकडे नवनवीन संधी दिसायच्या. अमेरिकेतले पाकीट माझ्या भारतातील पाकिटापेक्षा वेगळे कसे? अमेरिकेतील तिकिटापेक्षा भारतातील तिकीट वेगळे कसे? रात्री झोपायचे कसे? हिटर कसा वापरायचा? अगदी साधी गोष्टी विजेची इस्त्री, आमच्या भारतात कोळशावर चालणारी इस्त्री असायची. प्रत्येक गोष्टीत मला नावीन्य वाटू लागले आणि त्यातूनच माझा नवा प्रवास सुरू झाला.

टेक्नॉलॉजी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून समस्या सोडविण्याचे एक साधन होय, अनेकांना टेक्नॉलॉजी एक्झॉस्टीक, फॅन्सी व सेक्सी वाटत असते. टेक्नॉलॉजी ही आपल्या समस्या सोडविण्यासाठी असते. हे अगदी साधेसरळ आहे. आपण ते कसे आत्मसात करतो, यावर ते अवलंबून आहे. दुर्दैवाने, गेल्या ५० वर्षांतील महत्त्वाची टेक्नॉलॉजी अमेरिकेतून आलेली आहे.



जळगावच्या जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांचा मॅक्सवेल पुरस्कार देऊन सॅम पित्रोदा सत्कार करताना, शेजारी नितीन पोतदार, किरण कर्णिक आणि कुमार केतकर

अमेरिकेच्याबाहेर एकही शोध कोणीही लावलेला नाही, गोझे युरोपियन मित्रांची यावर तीव्र प्रतिक्रिया उमटते. पण, ते सत्य आहे, २-३ मूलभूत गोष्टी अशा आहेत की, ज्यामुळे गेल्या ५० वर्षांत सर्वकाही बदल झाला. पहिली गोष्ट ट्रँझिस्टर! १९४७ मध्ये ट्रँझिस्टरचा शोध लागला. आणि जग बदलून टाकले. त्या मागची कल्पना अगदी साधीसोपी आहे. ट्रँझिस्टरने आपल्याला रेडिओ, सेलफोन, इंटरनेट, कॉम्प्युटर, सॉफ्टवेअर, टूल्स, माहिती-तंत्रज्ञानातील क्रांती दिली आणि अवघ्या ५० वर्षांत जगाचा चेहरामोहरा बदलून गेला. दुसरी गोष्ट म्हणजे 'डीएनए'! जिनेटिक, बायोटिक. पहिला शोध ट्रँझिस्टरचा आणि दुसरा डीएनएचा. आज अशक्य गोष्टी शक्य होऊ लागल्या आहेत. अवास्तव वाटणाऱ्या गोष्टी वास्तवात शक्य होऊ लागल्या आहेत, आणि चांगल्या चांगल्या शक्यता सर्वत्र पोहोचवणे हाच माझा मुख्य हेतू आहे, उद्दिष्ट आहे. ट्रँझिस्टरच्या क्रांतीतून मी गेलेलो आहे. मी त्याचा कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या त्याचा एक भाग आहे. ज्या वेळी 'इंटेल' कंपनीची स्थापना झाली त्या वेळी मी तेथे प्रत्यक्षात उपस्थित होतो. त्या वेळी मी तरुण इंजिनियर होतो. मी ज्या वेळी अमेरिकेत गेलो त्या वेळी मला फिजिक्समध्ये पीएच. डी. करायची होती. तेथे गेल्यावर मला समजले की, पीएच. डी. साठी सात वर्षे लागतात. फिजिसिस्ट होण्याची माझी इच्छा होती. पदवी मिळविण्यासाठी ७-८ वर्षे लागतात, हे समजल्यावर मी माझ्या प्राध्यापकांकडे गेलो व म्हणालो, सर, माझी भारतात मैत्रिण आहे. इतकी वर्षे मी काय करू? त्यांनी मला विषय बदलून घेण्याचा सल्ला दिला. मी इलेक्ट्रीकल इंजिनियरचा अभ्यासक्रम निवडला आणि ९ महिन्यांत पदवी संपादन केली. कामाला सुरुवात केली आणि योगायोगाने टेलिकॉममध्ये नोकरी मिळाली. 'इग्नोरंट इज ए ग्रेट पॅशन'! श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी चर्चा केल्यानंतर जेव्हा मी भारतात परतलो, मी जॉब निश्चित केला. भारताची नेमकी परिस्थिती मला कळाली असती तर, मी

त्यासाठी कधीच प्रयत्न केले नसते. अमेरिकेत बऱ्यापैकी पैसा मिळविल्यानंतर १५ वर्षांनी मी भारतात परतलो व पत्नीला दिल्लीतून फोन केला. अचानक मला जीवनाचा अर्थ कळाला. मी थोडेफार पैसे कमावले होते. पैसे कमावण्यात मला मुळीच रस नव्हता. कारण, मी गांधीवादी वातावरणात लहानाचा मोठा झालो होतो. मी गांधीवादी शाळेत शिकलो, आमच्या घरातही गांधी हे आमचे आदर्श होते. मी लहान होतो तेव्हा गांधींजींचा



मृत्यू झाला. माझे वडिल माझ्याजवळ आले व म्हणाले, गांधींजी गेले आहेत. कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाल्यावर ज्या प्रमाणे सगळेजण आंघोळ करतात, त्या प्रमाणे त्यांनी आम्हा सगळ्यांना आंघोळ करण्यास सांगितले. त्या वेळी गुजरातमध्ये आम्ही राहात असताना आरमच्या घरासमोर गांधींजी, सरदार पटेल आणि नेहरू यांची मोठी पोस्टर लावलेली असायची, रोज आम्ही ते पोस्टर पाहायचो व हेच आपल्या जीवनातील खरे आदर्श आहेत. नंतर मी शिकागोला परतलो. अमेरिकेतील बहुतांश टेक्नॉलॉजी ही प्रामुख्याने संरक्षणासाठी वापरली जाते.

जगातील सर्वांत चांगली म्हण म्हणजे, फिजिक्स फक्त श्रीमंतांच्या समस्या सोडवतो.' आजही तीच परिस्थिती आहे. गरिबांच्या समस्या सोडविण्यासाठी योग्य प्रकारचे कौशल्य आढळत नाही. राजीव गांधी यांनी मला एक गरिबांसाठी काम करण्याची संधी देऊन माझ्या जीवनाला एक अर्थ प्राप्त करुन दिला. एक दशकाहून अधिक काळ मी त्यांच्यासमवेत होतो. त्यांनी मला फ्रीहँड दिला होता, जेव्हा आज आपण 'डिजीटल इंडिया'बद्दल बोलतो तेव्हा बऱ्याच लोकांना वाटते, ही गेल्या दोन वर्षांतील नवीन संकल्पना आहे. तुम्हाला मूर्खात काढण्याची संधी तुम्ही कोणालाही देऊ नका. 'डिजीटल इडिया'ची सुरुवात राजीव गांधी यांच्या काळात झालेली होती. 'एनआयसी'चे आधुनिकीकरण ही त्या काळात झालेली एक प्रकारची डिजीटल क्रांती होती. विविध प्रकारची आकडेवारी गोळा करणे, हे त्या काळात अगदी नवीन होते. राजीव गांधींबरोबर काम करताना आम्ही टेक्नॉलॉजी लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. निरक्षरता, गुन्हेगारी, खाद्यतेल, पिण्याचे पाणी, टेलिकॉम आणि नवीन उत्पादन, या सर्व सहा क्षेत्रात आम्ही टेक्नॉलॉजीचा वापर केला. लोकांना ते आठवत नाही..

आज आपण पोलिओ निर्मूलनाविषयी बोलतो. आपण वृत्तपत्रातून जाहिराती पाहतो की, एखादा चित्रपट अभिनेता लहान बालकास पोलिओचा डोस देत आहे. लोकांना वाटते हे आज घडत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, राजीव गांधींच्या काळात आम्ही पोलिओ निर्मूलनासाठी लसीच्या उत्पादनाचा निर्णय घेतला होता, याच शहरात त्याचे काम सुरू केले आणि आज आपण या लसीचे जगात सर्वाधिक उत्पादन करतो. कोणालाही आज ते आठवत नाही. एके दिवशी आम्ही डॉक्टरांची पोलिओ संदर्भात मिटिंग घेतली. डॉ. जोन्स यांच्यासह ६० ते ७० डॉक्टर उपस्थित होते. त्या दिवशी सायंकाळी भारतात पोलिओ लसीचे उत्पादन करण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी मी राजीव गांधींनी भेटलो व भारतात पोलिओ लसीचे उत्पादन करण्याची कल्पना मांडली असता, त्यासाठी किती खर्च येईल, असे त्यांनी विचारले. त्यावर ३०० दशलक्ष डॉलर खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यांनी त्याला हिरवा कंदील दाखविला. आणि आम्ही पोलिओ निर्मूलनासाठी अथक २५ वर्षे परिश्रम घेतले. पण, आज त्याचे कोणालाही स्मरण नाही. जे नेते जेव्हा गेल्या ५०-६० वर्षांत काहीच झाले नाही, असे म्हणतात तेव्हा त्यांची मला कीव करावीशी वाटते. ते त्यांचे अज्ञान असते व लोक त्यावरच विश्वास ठेवतात. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपल्याकडे अत्यल्प साधनसंपत्ती होती. आपल्या त्या वेळच्या नेत्यांना एक दूरदृष्टी होती. त्यांनी 'सीएसआयआर', ॲग्रीकल्चर रिसर्च सारख्या संस्था उभारल्या. त्याचे परिणाम दिसायला पन्नास वर्षे लागली. या गोष्टी काही एका रात्रीत घडल्या नाहीत. त्या संस्था, पायाभूत सुविधा त्या वेळी उपलब्ध केल्या नसत्या तर आज आपण जेथे आहोत, तेथे मुळीच नसतो.राजीव गांधींच्या जाण्याने देशाचे जे नुकसान झालेले आहे, ते आज लोकांना माहिती आहे त्या पेक्षा खूप अधिक आहे.

Post Regn. No. : MCS/208/2017-19
Published on 15th of every month, posted on 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849


# ऊसासाठी जैन ठिबक आता फक्त एकरी १७,४६३* रुपयात उपलब्ध !

जैन ठिबकचा ऊसासाठी ५' x १.५०' अंतराकरीता अंदाजे एकरी खर्च

| जैन ठिबक संचाचे विविध पर्याय | अंदाजे खर्च* |
|---|---|
| टर्बो स्लिम १२ मिमी, ६ मिल, ५० से.मी. | १७,४६३ |
| टर्बो स्लिम १६ मिमी, ६ मिल, ५० से.मी. | १९,१०५ |
| टर्बो एक्सेल १२ मिमी क्लास १, ५० से.मी. | २२,०२४ |
| टर्बो एक्सेल १६ मिमी क्लास १, ५० से.मी. | २७,७१९ |
| टर्बो एक्सेल १२ मिमी, क्लास २, ५० से.मी. | ३०,८०५ |
| टर्बो एक्सेल १६ मिमी, क्लास २, ५० से.मी. | ४०,७३८ |

जैन इनलाईन - पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार, विविध प्रवाह व साईज मध्ये तसेच दोन ड्रिपर्स मधील वेगवेगळ्या अंतरासह उपलब्ध !

* नियम व अटी लागू





जैन ठिबक®
अस्सल माल, अस्सल माणसं !

टोल फ्री नं. १८०० ५९९ ५०००; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

**त्वरा करा ! ऊसाचे उत्पादन व गोडी वाढवा - जैन ठिबक विक्रेत्याशी संपर्क साधा.**